# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/ 3031 /2021-22** **दि. 07/01 /2022**

**<u>कोव्हिड-19 प्राधान्य</u>**

प्रति,
सर्व विभागप्रमुख,खातेप्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- कोविड बुस्टर डोसच्या लसीकरणाबाबत
संदर्भ :- उप-आयुक्त (वैद्यकीय) यांचेकडील जा.क्र.मनपा/वैद्यकीय/3011/2021-22, दि.07/01/2022 रोजीचे पत्र.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फ्रंटलाईन वर्कर (FLW) यांनी दोन्ही डोस घेतले असतील तर त्यांना दुसऱ्या डोसच्या तारखेपासून 09 महिने किंवा 39 आठवडे पूर्ण झाले असल्यास कोविशिल्ड व कोवॅक्सिन लसीचे बुस्टर डोसकरीताचे (Precaution Dose) लाभार्थींकरीता लसीकरण सत्राचे दि.10/01/2022 पासून आयोजन करण्यात आले असल्याबाबत उप-आयुक्त (वैद्यकीय) यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी. सोबत संदर्भिय पत्र जोडण्यात येत आहे.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: mohmbmc४@gmail.com / moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## वैद्यकीय आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/३०७७/२०२१-२२ दिनांक:- ०५/१ /२०२२.

प्रती,
आस्थापना अधिक्षक,
आस्थापना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- कोविड बुस्टर डोसच्या लसीकरणाबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कोविड-१९ महामारीच्या प्रतिबंधासाठी दि. १६ जानेवारी २०२१ पासून संपूर्ण देशात व त्याअनुषंगाने राज्यशासनाच्या आदेशान्वये मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात टप्पाटप्प्याने कोविड-१९ लसीकरणास सुरुवात झाली. जगात वाढत असलेले कोविड रुग्ण व आढळून येत असलेल्या ओमायक्रॉन व्हेरिएंटमुळे कोविड-१९ वर्किंग ग्रुप ऑफ नॅशनल टेक्निकल ॲडव्हायझरी ग्रुप ऑफ इम्युनायझेशन (NTAGI) तसेच स्टॅन्डींग टेक्निकल सायन्टीफीक कमिटी (STSC) ऑफ (NTAGI) यांनी कोविड-१९ लसीकरण वाढविण्यासाठी निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील फ्रंटलाईन वर्कर (FLW) यांनी दोन्ही डोस घेतले असतील तर त्यांना दुसऱ्या डोसच्या तारखेपासून ९ महिने किंवा ३९ आठवडे पूर्ण झाले असल्यास कोविशिल्ड व कोवॅक्सिन लसीचे बुस्टर डोसकरीताचे (Precaution Dose) लाभार्थ्यांकरीता लसीकरण सत्राचे आयोजन दि.१०/०१/२२ पासून खालील तक्त्यात नमूद ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | लसीकरण केद्रांचे ठिकाण | पत्ता | वेळ |
|---|---|---|---|
| १ | आर२ गोल्डन नेस्ट | गोल्डन नेस्ट, सीसीसी समोर. क्रीडा संकुल, नवीन गोल्डन नेस्ट | सकाळी १०.०० ते संध्याकाळी४.०० |
| २ | अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल | सेवेन स्केवेयर शाळे जवळ, दीपक हॉस्पिटल रोड, मीरा रोड (पू) | |
| ३ | डेल्टा गार्डन | पांडुरंगवाडी, पेणकरपाडा, मिरारोड | |

तरी आपल्या अधिपत्याखालील विभागांना याबाबत अवगत करावे.

७/१

(संजय शिंदे)
उपायुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव
१. मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
२. मा. अति. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका